**पत्रलेखनाबाबत कार्यालयीन कामकाज**
**<u>नियमपुस्तिकेतील तरतूदींचे पालन करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०१८ / प्र. क्र. ८१ / १८ ( र. व का. )**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१८

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक : संकीर्ण १००५ / ५६६ / प्र. क्र. ३० / २००५ / १८ (र.व का. ), दिनांक १६ जून, २००५.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक : संकीर्ण २०१६ / प्र. क्र. २९ /१८ (र.व का. ), दिनांक १० फेब्रुवारी, २०१६.

<u>परिपत्रक :</u>

कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिकेतील ५३ (८) येथील तरतूदीनुसार शासकीय पत्रे निर्गमित करताना पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने स्वाक्षरीखाली कंसामध्ये नाव व त्याखाली पदनामाचा उल्लेख करण्याबाबत संदर्भांकित दिनांक १६ जून, २००५ तसेच दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ च्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अनुसार राज्य माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ यांचेसमोर दाखल झालेल्या द्वितीय अपिल क्रमांक के. आर. - ४३२४ / २०१७ संदर्भातील सुनावणीच्या वेळी माहितीच्या अधिकारांतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या फेरफारावर संबंधित तलाठी यांचे नाव लिहिलेले नसल्याने, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची नावे शोधण्यास आता अडचण निर्माण झालेली असल्याचे आयोगाच्या प्रकर्षाने निदर्शनास आले आहे.

३. सबब सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच त्यांच्या नियंत्रणाखाली सर्व विभाग / कार्यालये यांना पुन्हा सूचित करण्यात येते की, शासनाच्या वतीने करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार / प्रत्येक कागदपत्र / आदेश / पावती व इतर कोणत्याही प्रकारच्या दस्तऐवजावर सही करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी सहीखाली स्वत:चे नाव, पदनाम व कार्यालय स्पष्ट शब्दात नमूद करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्याचे पदनाम नमूद करुन “करीता” असा उल्लेख करून पत्रे निर्गमित करण्यात येणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१८०५३०११३०५१८२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Kumar Jain

Digitally signed by Dinesh Kumar Jain
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Chief Secretary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ea3b8615acaf5a916338801298bc1b7123bd0cac17faf57848ccd7382e28252c, cn=Dinesh Kumar Jain
Date: 2018.05.31 15:38:06 +05'30'

**( दिनेश कुमार जैन )**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ( ५ प्रती ),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती ( कार्यासन १८ ).